**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २६ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

- **नागपूर गोंदिया प्रवेश द्रुतगती महामार्ग प्रकल्पास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता.**
- **गणरायाच्या आगमनासाठी नागपूर शहर सज्ज, विविध मंडळातील बाप्पाचे वाजत गाजत स्वागत.**
- **शेतकरी हितासाठी कृषी मंत्र्यांची कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी.**
- **बाप्पांच्या निर्माल्यापासून निर्मित खत उद्यानांना देणार- नागपूर महानगरपालिकेच्या निर्माल्य रथाचे लोकार्पण.**

राज्य मंत्रिमंडळ निर्णय

नागपूर गोंदिया प्रवेश द्रुतगती महामार्ग प्रकल्पास आज झालेल्या राज्य मंत्री मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय प्रकल्प महामंडळामार्फत हाती घेण्यास, प्रकल्पाच्या आखणीस व भूसंपादनाकरीता देखील मान्यता देण्यात आली. नागपूर आणि अमरावती विभागातील निवासी वापरासाठी लिलावाव्दारे-प्रिमियम अथवा अन्य प्रकारे भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनी बाबत विशेष योजनेला आणखी एक वर्षाकरिता मुदतवाढ देण्याचा निर्णय आज घेण्यात आला. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती संवर्गातील लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याची कार्यपद्धती प्रभावीरित्या राबविणार असल्याचा निर्णय देखील घेण्यात आला तर राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्यास देखील मान्यता मिळाली आहे.

## मेक फॉर वर्ल्ड

भारताच्या मेक इन इंडियाच्या प्रवासात आज एक नवा अध्याय जोडला जात असून मेक फॉर वर्ल्डच्या दिशेनं ही मोठी झेप आहे,  असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं.  गुजरातमधल्या हंसलपूर इथं मेड इन इंडिया बॅटरी इलेक्ट्रिक वाहनं - 'ई वितारा'चं उद्घाटन पंतप्रधानांनी केलं, त्यावेळी ते बोलत होते. ही वाहनं युरोप आणि जपानसारख्या प्रमुख बाजारपेठांसह शंभराहून अधिक देशांमध्ये निर्यात होणार आहेत. भारत आणि जपान संबंधांना यामुळे नवा आयाम मिळेल असं पंतप्रधान म्हणाले.

***आज से भारत में बने इलेक्ट्रिक वेहिकल्स 100 देशों को एक्सपोर्ट किए जाएंगे। साथ ही आज हाइब्रिड बैटरी इलेक्ट्रोड मैन्युफैक्चरिंग भी स्टार्ट हो रही है। आज का ये दिन भारत और जापान की फ्रेन्डशिप को भी नया आयाम दे रहा है। मैं सभी देशवासियों को जापान को सुजुकी कंपनी को बधाई देता हूँ।***

येत्या काळात सर्व क्षेत्रात देशाला प्रगती करायची आहे. आजच्या प्रयत्नामुळे २०४७ चं विकसित भारताचं ध्येय नवी उंची गाठेल, जपान या ध्येयाच्या प्राप्तीत भारताचा विश्वासार्ह मित्र असेल अशी खात्री त्यांनी व्यक्त केली. गुजरातच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधानांनी इथल्या सुझुकी मोटार प्रकल्पालाही भेट दिली. पंतप्रधानांच्या उपस्थितीत हंसलपूर इथं हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोड्सच्या स्थानिक उत्पादनाचाही प्रारंभ झाला. तोशिबा, सुझुकी आणि डेन्सो यांचा हा संयुक्त उपक्रम आहे.

## गणेशउत्सव

१० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाला उद्यापासून सुरुवात होणार असून गणरायाच्या स्वागतासाठी सर्वत्र जय्यत तयारी होत आहे. महाराष्ट्रात यंदा गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्यामुळे उत्साह द्विगुणित झालेला दिसत आहे आणि त्याच्या तयारीला वेग आला आहे. नागपुरात मोठ्या उत्साहात  सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या पेंडलमध्ये गणरायाच्या आगमनाचा क्रम सुरू झाला आहे. नागपुरात अनेक गणेश मंडळाकडून वाजत, गाजत, ढोल ताशांच्या गजरात बाप्पाची मूर्ती मंडपात आणण्यात आली. नागपुरातील

महत्वाचा असलेला नागपूरचा राजा, हिलटॉपचा राजा, महाल चा राजा मंडळाच्या गणपतीचं वाजत गाजत ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक काढून त्यांचे फुलांच्या सुगंधात, ढोल-ताशांच्या गजरात आगमन होत आहे. या पार्श्वभूमीवर शहरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शहरातील तलावांचे प्रदूषण थांबविण्यासाठी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा म्हणून बाप्पाला निरोप देताना महापालिका प्रशासन सज्ज आहे. शहरातील दीड दिवसाच्या घरगुती गणपतीला निरोप देण्यासाठी महापालिकेने कृत्रिम तलाव सज्ज ठेवण्यात आले आहे. आयटी पार्कमध्ये यंदा 'व्हीआयपीएलचा राजा' चे दमदार आगमन होत असून पुढचे दहा दिवस येथे विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी नागरिकांना मिळणार आहे.

<u>कृत्रिम फुलं</u>

राज्यात ऊद्यापासून गणेशोत्सवाला सुरवात होत आहे. घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासाठी आरास व मखर तयार करण्याकरीता मोठ्या प्रमाणावर फुलांचा वापर केला जातो. मात्र, शेतकऱ्यांनी शेतात पिकविल्या नैसर्गिक फुलांऐवजी चीन मधून आयात केलेल्या प्लास्टिक अथवा सिंथेटिक पदार्थांपासून बनवलेली कृत्रिम फुले मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहेत. हा वापर शेतकऱ्यांच्या आर्थिक ऊत्पन्नावर विपरीत परिणाम करणारा तर आहेच, परंतु पर्यावरणालाही हानीकारक आहे. आज कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या पुढाकाराने पर्यावरण, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री पंकजा मुंडेंना यासंदर्भात पत्र देत कृत्रिम फुलांच्या वापरामुळे शेतकऱ्यांवर ओढवलेल्या आर्थिक संकटातून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी, शेतकरी हितास्तव पर्यावरण विभागामार्फत आवश्यक कायदेशीर उपाययोजना करत कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी केली.

<u>निर्माल्य</u>

श्री गणरायाच्या आगमणासह पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याकरिता नागपूर महानगरपालिकेची संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली झाली आहे. विशेष म्हणजे, गणपती बाप्पांच्या निर्माल्यापासून खत निर्मिती केली जाणार आहे. निर्माल्यापासून गांडूळ खत निर्माण करण्यात येणार असून, या खताचा वापर उद्यान/गार्डन मध्ये खत म्हणून वापर करण्यात येणार आहे. याद्वारे खतापासून

उद्याने बहरणार आहेत. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांच्या हस्ते आज निर्माल्य रथांचं लोकार्पण करण्यात आलं. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नागपूर महानगरपालिके द्वारे दरवर्षी शहरातील विविध गणेश मंडळांमध्ये जमा असलेले निर्माल्य विशेष निर्माल्य कलशामध्ये संकलित केले जाते. दरवर्षी १० झोनमध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे १० निर्माल्य रथांची व्यवस्था करण्यात येत होती. पण या रथांना मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता यावर्षी ९ अतिरिक्त रथ वाढविण्यात आले असून, यंदा दहा झोनमध्ये १९ निर्माल्य रथांची सेवा मिळणार आहे. यात ५ विद्युत ई- रथांचा देखील समावेश आहे. यात ए.जी. एन्व्हायरोच्या १२ व बीव्हीजी इंडियाच्या ७ वाहनचा समावेश आहे.

भंडारा जिल्हयाचे पालकमंत्री

भंडारा सामान्य प्रशासन विभागाच्या काल च्या शासन निर्णयानुसार भंडारा जिल्हयाचे पालकमंत्री म्हणून राज्य मंत्री गृह (ग्रामीण),गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म डॉ.पंकज कांचन राजेश भोयर यांची नियुक्ती शासनाने केली आहे. त्याच आदेशान्वये भंडारा जिल्हयाचे पुर्व पालकमंत्री संजय सावकारे यांची बुलढाणा जिल्हयाचे सहपालकमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

क्रीडा दिन

29 ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. जिल्हा क्रीडा कार्यालय, नागपूर आणि एकविध खेळ संघटनेच्या मार्फत क्रीडा दिनाच्या निमित्तानं 28 ऑगसट रोजी सायंकाळी 5 वाजता विभागीय क्रीडा संकुल, मानकापुर इथं 10 वर्षांखालील मुले व मुलिंसाठी जिम्नॅस्टिक, ज्योतिबा माध्यमिक विद्यालय, नंदनवन येथे दुपारी 3 वाजता १५ वर्षाखालील मुले व मुलींसाठी व्हॉलीबॉल, 29 ऑगस्ट रोजी सायंकाळी 5 वाजता महिला महाविद्यालय, नंदनवन येथे १४ वर्षाखालील मुले व मुलींसाठी खो-खो, 30 ऑगस्ट रोजी सकाळी 9 वाजता विभागीय क्रीडा संकुल, मानकापुर येथे १५ वर्षाखालील मुले व मुलींसाठी हँडबॉल व 31 ऑगसट रोजी सकाळी 9 वाजता पोलिस मुख्यालय काटोल नाका रोड येथे क्रीडा शिक्षकांसाठी फुटबॉल या क्रीडा प्रकाराचे आयोजन करण्यात आलं आहे.

## फ्लाइंग क्लब

विदर्भातील विमान प्रशिक्षणाला चालना देण्यासाठी, राज्य सरकारनं २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी नागपूर फ्लाइंग क्लबसाठी ४९.७५ लाख रुपयांचं अनुदान मंजूर केलं आहे. काल जारी केलेल्या सरकारी निर्णयानुसार या निधीतून प्रशिक्षण संस्थांसाठी विमान देखभाल, इंधन, वेतन आणि पायाभूत सुविधांची देखभाल करण्यात येणार आहे.

## श्रद्धांजली सभा

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे सन्माननीय कुलगुरू प्रो हरेराम त्रिपाठी यांचं उत्तरप्रदेश इथं जात असताना 23 ऑगस्ट रोजी रस्ते अपघातात दुर्दैवी निधन झालं. या अपघातात त्यांच्यासह त्यांची पत्नी बदामीदेवी त्रिपाठी आणि कार चालक वैभव मिश्रा यांचाही दुर्दैवी अंत झाला. प्रो.हरेराम त्रिपाठी यांना श्रद्धांजली समर्पित करण्यासाठी विशेष श्रद्धांजली सभेचं आयोजन गुरुवारी २८ ऑगस्ट रोजी विश्वविद्यालयाच्या डॉ.कमलाकर तोतडे सभागृहात दुपारी 2.00 वाजता करण्यात आलं आहे.

*****